**ePaper** **5 मंत्र्यांच्या गच्छंतीसाठी भाजपचा दबाव; शिंदे गटामध्ये अस्वस्थता**



वर्ष - 7 । अंक -46 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

।सोमवार, दि. 12 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews. | www.mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# माऊली... तुकारामचा जयघोष!

## माऊलींच्या पालखीचे प्रस्थान अन् तुकोबांच्या पालखीचे स्वागत



*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ॥*
*आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा॥*
*कोणाही जीवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे॥*
*तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुखदुःख जीव भोग पावे॥*

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**माऊली माऊलीच्या जयघोषात माऊलींच्या (ALANDI) पालखीचे दि.11 जून रोजी सायंकाळी पावणेसात वाजता प्रस्थान झाले. तदपूर्वी सायंकाळी पाच वाजता माऊलींच्या अश्वांचे मंदिरात आगमन झाले. माऊलीचे अश्व मंदिर प्रदक्षिणा घालत मंदिरा बाहेर प्रवेश झाला. मंदिरामध्ये मान्यवर मानकऱ्यांचा यावेळी श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.**

मंदिरामध्ये श्रींची आरती झाली. त्यानंतर वीणा, टाळ, मृदंग, टाळ्यांच्या गजरात,माऊलींच्या पालखीवर पुष्प वृष्टी करत, माऊली माऊली च्या जयघोषात माऊलींच्या पालखीचे प्रस्थान झाले .माऊलींच्या पालखीची मंदिरात प्रदक्षिणा झाल्यानंतर तीने आजोळघराकडे प्रस्थान केले. दि. 11 जून आजचा मुक्काम देऊळ वाड्यातील आजोळघरी आहे. उद्या दि.12 ला आजोळ घरातून(आळंदीतून) सकाळी माऊलींची पालखी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करेल.

यावेळी प्रस्थान सोहळ्या श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, श्रीमंत महादजीराजे शितोळे सरकार, पालखी सोहळा मालक आरफळकर, विश्वस्त विकास ढगे पाटील, विश्वस्त योगेश देसाई, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, अभय टिळक, तुकाराम माने व माऊलींचे मानकरी,खांदेकरी, सेवेकरी वर्ग, वारकरी उपस्थित होते. तसेच शासकीय विविध वरिष्ठ आधिकारी व कर्मचारी वर्ग यावेळी उपस्थित होते.

खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार यांनी या समयी सदिच्छा भेट दिली. प्रदक्षिणा रस्त्यावर पालखी प्रस्थान सोहळ्या निमित्त मोठ्या संख्येने वारकरी भाविक माऊलींच्या दर्शनासाठी उपस्थित होते.

संत तुकाराम महाराजांच्या पालखीने शनिवारी (दि. 10) देहू येथील शिळा मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात झाला. त्यानंतर रविवारी सकाळी पालखी पुढे निघाली. सायंकाळी 4.55 वाजता निगडी येथे तिचे आगमन झाले. भक्ती शक्ती चौकामध्ये विसावा घेतल्यानंतर पालखी पुढे आकुर्डी येथील विठ्ठल मंदिराकडे मुक्कामासाठी रवाना झाली.

निगडी भक्ती शक्ती चौकात आकर्षक रांगोळ्यांनी पालखीचे स्वागत करण्यात आले. महापालिका प्रशासन आणि विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि कंपन्यांच्या वतीने स्वागत कक्ष उभारण्यात आले होते. दिंड्यांमधील वारकऱ्यांना विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.

### उद्योगनगरीमध्ये तुकोबांच्या पालखीचे स्वागत

»संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड मध्ये रविवारी (दि. 11) सायंकाळी 4.55 वाजता आगमन झाले. आगमनासाठी महापालिका प्रशासन आणि विविध राजकीय पक्षांच्या तसेच संस्थांच्या वतीने उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षातून दिंड्यांचे स्वागत करण्यात आले. शहरातील हजारो भाविकांनी पालखीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. पालखीचा आजचा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात आहे.

# पोलीस-वारकऱ्यांमध्ये झटापट!

## 47 दिंड्या अन् हजारो वारकरी, मंदिरातल्या प्रवेशावरुन पोलीस आणि वारकरी आमनेसामने!

**पोलिसांकडून वारकऱ्यांवर सौम्य लाठीचार्ज...**

**वादानंतर पोलीस बंदोबस्तात वाढ...**



। आळंदी, पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पालखी सोहळ्याला काही प्रमाणात गालबोट लागलं आहे. पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी आणि पोलिसांमध्ये वाद झाला आहे. मंदिरातील प्रवेशावरुन हा वाद झाला आहे. पोलिसांनी वारकऱ्यांवर सौम्य लाठीचार्ज केल्यामुळे वारकऱ्यांकडून नाराजीचा सूर आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं आज प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. मात्र या पालखीला गालबोट लागणारी घटना समोर आली आहे. दर्शनासाठी मंदिरात प्रवेश करण्यावरून मंदिर परिसरात वारकरी आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. त्यामुळे काही वेळ तणावाचे वातावरण पहायला मिळाले.**

वारकरी प्रस्थानावेळी वारकऱ्यांचा आणि पोलिसांचा शाब्दिक वाद झाला. त्याचवेळी वारकऱ्यांनी बॅरिकेड्स लोटून देत मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पोलिस त्यांना अडवण्यासाठी पुढे सरसावले. मात्र वारकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यात त्यांच्यात पुन्हा एकदा वाद झाला. त्यात पोलिसांनी आक्रमकपणे वारकऱ्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी पोलिसांनी हातातील लाठ्याही पोलिसांवर उगारल्या. त्यानंतर थोड्या वेळात प्रकरण शांत करण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. मात्र हजारोंच्या संख्येने असलेले वारकरी आक्रमक झाले आहेत. काही वारकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मंदिरात ४७ दिंड्यांना प्रवेश आहे. प्रत्येक दिंडीतील ७५ वारकऱ्यांना त्यात प्रातिनिधिक स्वरूपात प्रवेश आहे. त्यामुळे मंदिराच्या बाहेर मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ज्या वारकऱ्यांना प्रवेश नाही, अशांनी प्रवेश देण्याचा आग्रह केला. त्यातून पोलीस आणि वारकऱ्यांच्या झटपट झाली, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.

सद्या पोलिसांकडून मंदिर परिसरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून कोणालाही मंदिरात प्रवेश दिला जात नसल्याचे समोर येत आहे.

काही वेळात पालखीचे प्रस्थान होणार असून लाठीचार्जच्या चर्चांवर पोलिसांकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. सद्या परिसरात शांततेचे वातावरण आहे.

### वारकरी संप्रदायाचा हा खूप मोठा अवमान : कोल्हे

**श्री क्षेत्र आळंदी येथे वारकरी बांधवांवर पोलिसांनी लाठीमार केल्याच्या घटनेसंदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षकांसोबत फोनद्वारे सविस्तर चर्चा केली आहे. ही घटना अत्यंत चीड आणणारी असून या कृतीचा मी तीव्र निषेध करतो. भागवत धर्माची पताका घेऊन चालणाऱ्या आणि अत्यंत शांततेत भक्तीमार्गाचे आचरण करणाऱ्या संपूर्ण वारकरी संप्रदायाचा हा खूप मोठा अवमान आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तत्काळ कारवाई करण्यात यावी, ही नम्र विनंती!**

### शासनाने चौकशी करावी : छगन भुजबळ

आळंदी येथे वारकरी बांधवांवर पोलिसांनी लाठीमार केल्याचा प्रकार अत्यंत संतापजनक आहे. वारकरी संप्रदायाचा पाया रचणारे थोर संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदीत वारकरी बांधवांचा झालेला हा अपमान अत्यंत निषेधार्ह आहे. वारकरी संप्रदाय, वारकरी बांधव यांच्याबद्दल सरकारची काही जबाबदारी आहे की नाही? शासनाने तातडीने याची दखल घेऊन हा प्रकार घडवून आणणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत.

**“ पालखी प्रस्थान सोहळा हा दरवर्षी आयोजित होतो. आजही मानाच्या 56 पालख्या आल्या होत्या. गेल्यावर्षी चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली होती आणि त्यावेळी काही महिला सुद्धा जखमी झाल्या होत्या. त्यामुळे यावर्षी प्रधान जिल्हा न्यायाधीश, धर्मादाय आयुक्त, मंदिर प्रमुख विश्वस्त यांच्यासोबत 3 वेळा बैठका घेऊन गेल्यावर्षीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून प्रत्येक मानाच्या पालखीतील प्रत्येकी 75 जणांना प्रवेश देण्याचा निर्णय पूर्वीच घेण्यात आला आणि तसे नियोजन सुद्धा करण्यात आले. मानाच्या दिंडीप्रमुखांनी सुद्धा तो मान्य केला. त्यानुसार पासेस वितरित करण्यात आल्या. मुख्य म्हणजे सर्व मानाच्या दिंडी प्रत्येकी 75 जणांनाच पाठवित होते. मात्र अचानक काही स्थानिक युवकांनी मध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. मंदिर विश्वस्त आणि चोपदार सुद्धा त्यांना समजावण्यासाठी आले. पण ते युवक ऐकत नव्हते. बॅरिकेड तोडून त्यांनी आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्या स्थानिकांशी केवळ किरकोळ झटापट झाली, पोलिसांनी लाठीचार्ज किंवा बळाचा वापर केलेला नाही. त्यामुळे लाठीचार्ज केला, हे म्हणणे खोटे आहे. सर्व वारकरी, प्रशासनाला उत्तम सहकार्य करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची उच्च परंपरा असलेल्या वारीला उगाच गालबोट लावण्याचा प्रयत्न कुणी करू नये, ही माझी नम्र विनंती आहे.**

**- विनयकुमार चौबे, पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड**

# पुणेकरांनो, सावधान! ऑनलाइन टास्कच्या नादात हातचे गमवाल!

## एक चूक तुमचे बँक खाते रिकामे करु शकते



। पुणे । महाईन्यूज

**ऑनलाइन टास्कद्वारे पैसे कमवा, अशा आशयाचा संदेश किंवा कॉल आल्यास सावधान! समाजमाध्यमांतील जाहिराती किंवा चित्रफितींना लाइक मिळवून देण्याचे काम महागात पडू शकते. ऑनलाइन टास्क ही सायबर चोरट्यांची नवीन क्लृप्ती असून या खेळांत अडकल्यास लाखो रुपयांना गंडा बसू शकतो. फेब्रुवारीपासून शहरात सुरू झालेल्या या प्रकारामुळे आत्तापर्यंत सुमारे पन्नास जणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली आहे.**

ऑनलाइन टास्कमध्ये व्हॉट्सअॅप, टेलिग्राम किंवा अन्य समाजमाध्यमाद्वारे संदेश पाठवून आर्थिक लाभाचे आमिष दाखवले जाते. जाहिरात किंवा चित्रफितीला लाइक किंवा क्लिक करण्याचे काम देण्यात येते. विश्वास मिळविण्यासाठी सुरुवातीला खात्यात काही पैसे जमा केले जातात. त्यानंतर ‘पेड टास्क’च्या नावाखाली पैसे गुंतवण्यास भाग पाडले जाते. नागरिकांनी मोठी गुंतवणूक केल्यानंतर संपर्क तोडला जातो. फसवणूक झाल्याचे लक्षात येईपर्यंत बराच उशीर झालेला असतो. या प्रकारांमध्ये उच्चशिक्षित तरुण-तरुणींची फसवणूक होण्याचे प्रमाण जास्त आहे. उच्चशिक्षित तरुण-तरुणी दिवसातला खूप वेळ सोशल मीडियावर असतात. त्यामुळे अशा कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नका, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

लोक भूलथापांना बळी पडून स्वत:हून पैसे पाठवित असल्याने सुशिक्षित लोकांना यापासून कसे रोखायचे, असा प्रश्न पोलिसांना पडला आहे. या प्रकरणी पोलिसांकडे आत्तापर्यंत ४७ अर्ज आले आहेत. त्यापैकी अठरा प्रकरणांत गुन्हा दाखल आहे. बारा गुन्हे सायबर पोलिस ठाण्यात आणि सहा गुन्हे इतर पोलिस ठाण्यांत दाखल आहेत. पोलिसांना बँकांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने तक्रारदाराकडून पैसे पाठविण्यात आलेल्या खात्याची माहिती आणि ठावठिकाणा शोधण्यास पोलिसांना अडचण येत आहे.

# हरितवारी प्लास्टिकमुक्त वारी..!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा संदेश : विद्यार्थी-वारकऱ्यांसोबत धरला ठेका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हरीनामाचा जयघोष करित पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे शहरात आगमन झाले. या सोहळ्याचे स्वागत शहराच्या वतीने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी केले. तसेच काही अंतर पालखी रथाचे सारथ्य देखील केले.**







निगडी येथील भक्ती शक्ती चौकात झालेल्या या स्वागत सोहळ्याला आमदार उमा खापरे, अश्विनी जगताप यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, बाबासाहेब गलबले, मनोज सेठीया, प्रमोद ओंभासे, डॉ. ज्ञानदेव जुंधारे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आदींनी दिंडी प्रमुखांचा सत्कार केला.

यावर्षी दिंडी प्रमुखांना कापडी पिशवी, प्रथमोपचार पेटी, संपर्क क्रमांक असलेली माहिती पुस्तिका तसेच झाडांच्या बिया, पुष्पहार आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वृक्षारोपण, वृक्षदिंडी, हरीतवारी असे विविध उपक्रम देखील महापालिकेच्या वतीने राबविण्यात आले. स्वागताच्या ठिकाणी जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अभंग गायनाचा कार्यक्रम सादर केला. पारंपरिक वेशभुषेत असलेले आयुक्त शेखर सिंह यांनी अभंगावर ठेका धरत वारीत सहभाग घेतला तसेच फुगडीचा आनंदही घेतला.

प्रारंभी, पुना गेटसमोरील मोकळ्या जागेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग होता.

### मुक्कामाच्या ठिकाणी चोख व्यवस्था...

आषाढीवारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने स्थापत्य, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्थेबरोबरच यंदाची वारी पर्यावरणपूरक, प्लास्टिक मुक्त, हरितवारी करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते. पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन, पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात शौचालयांची व्यवस्था करण्यात आली.

आकुर्डी येथील विठ्ठल रुख्मिणी मंदीरामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामासाठी विसावला.

दिंड्यांच्या मुक्काम ज्या महापालिकेच्या शाळांमध्ये असतो तसेच इतर खाजगी ठिकाणी असतो तेथे महापालिकेच्या वतीने आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. पुरेसे शौचालय, स्नानगृह, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा अशा आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन देताना प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र समन्वयकाची नेमणूक करण्यात आली आहे. पालखी सोहळ्यासोबत पिण्याच्या पाण्याचे टँकर, रुग्णवाहिका तसेच अग्निशमन वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### पर्यावरण वारी...

**यावेळी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेण्यात आली. वृक्षारोपण कार्यक्रमानंतर भक्ती शक्ती चौकापर्यंत हरितवारी दिंडी काढण्यात आली. पर्यावरणाचा संदेश, 'झाडे लावा झाडे जगवा', 'हरितवारी प्लास्टिकमुक्त वारी' असे फलक हातात धरून ही दिंडी स्वागत कक्षाच्या दिशेने मार्गस्थ झाली. यामध्ये आयुक्त शेखर सिंह यांच्यासह सर्व अधिकारी, संतपिठाचे विद्यार्थी, शिक्षक, महापालिकेचे माजी पदाधिकारी, देहू संस्थानचे पदाधिकारी, परिसरातील नागरिक सहभागी झाले होते. स्वागताच्या ठिकाणी पर्यावरणाचा संदेश असलेला सेल्फी पॉइंट सर्वांचा लक्ष वेधून घेत होता तर स्वागत कक्षाच्या बाजूला विठ्ठल तसेच संत श्री तुकारामांचे महाराजांचे फुलातील छायाचित्र रेखाटण्यात आले होते. तर एका चित्रकाराने पर्यावरण आणि वारी यांचा सुरेख संगम करत लाईव्ह चित्र रेखाटल्याच्या दृष्य आजच्या पालखी सोहळ्यातील विशेष आकर्षण ठरले.**

# तुकोबांच्या पालखीचे आमदार लांडगेंकडून 'सारथ्य'

## भक्तीमय वातावरणात पालखी सोहळ्याचे स्वागत, वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी भाजपा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज

**जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३३८ व्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन झाले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी पालखीचे सारथ्य केले.**



पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालखी सोहळ्याचे स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात हजारो वारकरी आज शहरात दाखल झाले आहेत. ज्ञानोबा माऊली तुकाराम... च्या गजराने अवघी उद्योगनगरी दुमदुमून निघाली.

भारतीय जनता पार्टी आणि आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने वारकऱ्यांसाठी खाऊ वाटप, छत्री वाटप, पाणी बॉटल वाटप, रेनकोट वाटप यासह प्रथमोपचार सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यावेळी आमदार उमा खापरे, माजी महापौर राहुल जाधव, माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, स्थायी समितीचे माजी सभापती नितीन लांडगे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, तुकोबारायांच्या पाखलीचे सारथ्य करण्याचे भाग्य लाभले. भारतीय जनता पार्टी आणि तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली. सर्व भेद अभेद बाजूला सारुन हरीचे नाम प्रेमाने उच्चारावे हीच खरी हरीची सेवा आहे. तुकाराम महाराज म्हणतात, "हा देव केवळ भक्तीभावानेच संतुष्ट होतो म्हणजे हरीनाम घोष चालू आहे तेथेच हा हरी राहात असतो." याची अनुभूती आली.

# विश्वविजेता होण्याची भारताची कुवत आहे का?



## क्रीडांगण

-सुनील शशिकांत शाळगावकर
क्रिकेट प्रशिक्षक
9850217509

**ओव्हल येथे झालेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा दारुण पराभव केला आणि अजिंक्य पद मिळवले. ऑस्ट्रेलियाच्या नियोजनबद्ध खेळापुढे भारतीय संघ सपशेल कोलमडला.**

ओव्हल च्या ढगाळ हवामानात हिरव्या खेळपट्टीवर रोहित शर्मा ने नाणेफेक जिंकून अपेक्षेप्रमाणे गोलंदाजी स्वीकारली.शमी आणि सिराज ने सुरवात तर चांगली केली पण नंतर सर्वच वेगवान गोलंदाजानी काहीसा आखूड मारा केला आणि काहीशा अडचणीत सापडलेल्या ऑस्ट्रेलिया चे काम सोप्पे केले. ट्रॅवीस हेड ने आक्रमक तर स्मिथ ने संयमी फलंदाजी करून दिवस अखेर ऑस्ट्रेलिया ला सुस्थितीत नेले.पहिल्या डावात साडे चारशे च्या वर धावा करून ऑस्ट्रेलिया ने सामन्याचा निकाल जवळपास तिथेच स्पष्ट केला होता. सुरवातीचा एक तास सोडला तर भारतीय गोलंदाजी पुर्ण प्रभावहीन होती. त्यात अश्विन ला वगळून एक जादा वेगवान गोलंदाज खेळवण्याचा रोहित चा निर्णय चुकला असे वाटले.

ICC स्पर्धेत निर्णायक सामन्यात अपयशाची भारतीय फलंदाजांची मालिका येथेही कायम राहिली.रोहित विराट शुभमन गिल पुजारा सगळेच स्वस्तात परतले. ऑस्ट्रेलियन गोलंदाजानी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करून भारतीय फलंदाजना जखडून ठेवले. पुनरागमन करणारा रहाणे आणि त्याला तोलमोलाची साथ देणारे जडेजा आणि ठाकूर यांच्यामुळे भारताने तीनशेचा टप्पा गाठला.



बोटाला दुखापत होऊनही तंत्रशुद्ध आणि जिगरबाज फलंदाजी चे प्रदर्शन रहाणे ने केले.

पहिल्या डावात दोनशे धावांची आघाडी घेतलेल्या ऑस्ट्रेलिया ने दुसऱ्या डावात सावध फलंदाजी करून सामना भारताच्या आवाक्याबाहेर नेला. सर्वच फलंदाजानी उपयुक्त योगदान दिले आणि भारतासमोर साडे चारशे धावांचे अशक्यप्राय आव्हान ठेवले.

चौथ्या डावात भारताने सुरवात तर चांगली केली पण शुभमन चा वादग्रस्त झेल आणि रोहित नी फेकलेली विकेट तसेच पुजारा चे अजून एक अपयश यामुळे भारत अडचणीत आला. विराट आणि रहाणे ने दिवस अखेर पर्यंत किल्ला लढवला आणि चाहत्याना अखेरच्या दिवशी चमत्काराची आशा दाखवली. पण अखेरच्या दिवशी ऑस्ट्रेलिया पुढं सपशेल लोटांगण घातले आणि चाहत्यांच्या आशेवर पाणी फिरवले.

संपूर्ण सामन्यात ऑस्ट्रेलिया नी सर्व बाबतीत भारताला निष्प्रभ केले तर भारतीय संघाचा खेळ आणि देहबोली नकारात्मक होती. वेगवान गोलंदाजानी हिरव्या खेळपट्टीवर आखूड मारा केला तर जडेजा पूर्णपणे प्रभावहीन होता. फलंदाजी मध्ये फक्त रहाणे ने किल्ला लढवला पण मोठी खेळी तो पण नाही करू शकला.रोहित विराट पुजारा पुन्हा अपयशी ठरले.पुजारा ला अजून किती दिवस पोसणार तसेच रोहित अजून किती दिवस धावा न करता खेळणार हा प्रश्नच आहे.विराट सुद्धा आश्वासक सुरवात करतोय पण मोठी खेळी नाही करते. आघाडीची फळीच अपयशी ठरली तर तुम्ही विश्वविजेते नाही बनू शकणार हे समजायला पाहिजे. घरच्या मैदानावर आखाड्यात परदेशीं संघाना चोपायचे आणि तटस्थ देशात जाऊन अंतिम फेरीत लोटांगण घालायचे याला काहीच अर्थ नाही. जुन्या अपयशी खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवून नव्या रक्ताला वाव देण्याची हिच वेळ आहे. तसेच घरच्या मैदानात गोलंदाज तसेच फलंदाजाना समान संधी असणाऱ्या खेळपट्ट्या बनवाव्या लागतील नाहीतर दर वेळेस तुम्हाला पराभवाचा सामना करावा लागेल आणि चाहत्यांचा भ्रमनीरास होणार हे नक्की.

## संपादकीय »

### वेगवान , गतीमान शासन

***मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३० मे रोजी सत्तेत येऊन ११ महिने पूर्ण झाले. या अकरा महिन्याच्या काळात महाविकास आघाडी सरकारच्या कामापेक्षा शिंदे-फडणवीस सरकारने दुप्पट वेगाने काम केल्याचे दिसून आले आहे. ..***


डिसेंबर २०१९ ते जून २०२२ या अडीच वर्षाच्या काळात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत होते. हा अडीच वर्षाचा कालखंड महाराष्ट्राच्या जनतेच्या दृष्टीने एखाद्या दु:स्वप्नासारखा होता. या अडीच वर्षाच्या काळात मुख्यमंत्री असणारे उद्धव ठाकरे हे काही तासासाठीच मंत्रालयात फिरकले होते. घरात बसूनच त्यांनी सरकारी कारभार चालवला होता. सामान्य नागरिकांच्या ते संपर्कात नव्हतेच पण आपल्या सहकारी मंत्र्यांच्या संपर्कात रहावे असे त्यांना वाटतं नव्हते. महाविकास आघाडीचे आधारस्तंभ असलेल्या शरद पवार यांनी उद्धवराव ठाकरे यांच्यावर मंत्रालयात न जाण्याबद्दल ‘लोक माझे सांगाती’ या पुस्तकात नाराजी व्यक्त केली आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुलाखत घेण्यास मोठा विलंब झाल्याने एका तरुणाने आत्महत्या केल्याचे पडसाद राज्यात उमटले. खरोखरच दुर्दैवी अशी घटना होती. ही परिस्थिती निर्माण का झाली, हे पाहणे गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या, दरवर्षी पदवीधर होणाऱ्यांची संख्या यांमुळे रोजगाराच्या संधी त्या प्रमाणात नसल्याने बेरोजगारीचा आकडा वाढतो.**

## स्पर्धा परीक्षेलाच बनवा 'प्लॅन बी'

शिवाय, शेती किफायतशीर नसल्याने ग्रामीण भागातील युवकांना नोकरीचा पर्याय निवडणे अनिवार्य होते. मात्र, सरकारी नोकरी ही बेरोजगारीवर उत्तर होऊ शकते का? देशातील आणि राज्यांतील याची आकडेवारी शास्त्रीय पद्धतीने संकलित होत नसली, तरी सॅम्पल सर्व्हेनुसार देशातील एकूण रोजगारापैकी ९४ टक्के रोजगार असंघटित क्षेत्रात आहे. जो सहा टक्के रोजगार संघटित क्षेत्रात आहे, त्यामध्ये ग्राम पंचायतीपासून केंद्र सरकारपर्यंत असलेल्या शासनव्यवस्थेत फक्त साडेतीन टक्क्यांपर्यंत रोजगार मिळतो. व्यवसाय, खासगी क्षेत्रातील रोजगार वाढविण्याच्या उपाययोजना म्हणजे कारखानदारी वाढविणे, आयटी वगैरे सेवाक्षेत्रे विकसित करून त्यामध्ये संधी वाढविण्यासाठी वाव असतो; तसा तो सरकारी नोकऱ्यांबाबत नसतो. तेथील पदे केवळ रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी नसतात. किंबहुना जनतेवरील कराचा भार कमी करून भांडवली खर्चासाठी अधिक रक्कम उपलब्ध होण्यासाठी सरकारी नोकऱ्या कमी करण्याकडे कल असतो. त्यामुळे रोजगारासाठी सरकारी नोकऱ्या हा उपाय कधीच नव्हता. भविष्यात जसा देश विकसित होत जाईल, तशा शासकीय रोजगाराच्या संधी कमी होतील.

त्यामुळे पहिला मुद्दा असा की, देशाचा बेरोजगारीचा दर कमी ठेवायचा असेल, तर असंघटित क्षेत्र, शेती, व्यवसाय, सूक्ष्म-लहान-मध्यम-मोठे उद्योग, सेवा क्षेत्र यांमध्ये संधी वाढविण्यास जसा वाव आहे; तसाच रोजगार शोधण्यासाठीही ९७ टक्के



संधी या शासनाच्या व्यतिरिक्त क्षेत्रात असल्याने त्यावर प्राधान्यक्रमाने लक्ष देणे आवश्यक आहे. केंद्रीय किंवा राज्य लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परीक्षांमार्फत निवड करून भरली जाणारी वरिष्ठ पदे ('वर्ग-१/अ' किंवा 'वर्ग-२/ब') खूप कमी असतात. त्यामुळे अत्यल्प पदांसाठी देशपातळीवर आणि राज्यात अतिप्रचंड स्पर्धा असते. उपलब्ध रिक्त पदे आणि इच्छुक उमेदवारांची संख्या पाहता ती दुर्दैवाने जीवघेणी होऊ शकते. 'आयएएस', 'आयपीएस' वगैरे अखिल भारतीय सेवांमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे (यूपीएससी) दरवर्षी सुमारे एक हजार अधिकाऱ्यांची निवड होते; पण त्यासाठी दहा ते अकरा लाख अर्जदार असतात.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादीत मी समाधानी!

## सुप्रियांचे नाव आपणच सुचवले, अजितदादांचा राजकीय चर्चांना पूर्णविराम

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाकरी फिरवली आणि दोन कार्यकारी अध्यक्ष जाहीर केले. सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल हे कार्यकारी अध्यक्ष झाले. पण यानंतर अजित पवार यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. अखेर अजित पवारांनीच सांगितलं...**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदी सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल**

**अजित पवार यांनी भूमिका मांडत राजकीय चर्चांना दिला पूर्णविराम**

**आम्ही सगळ्यांनी मिळून निवडीचा निर्णय घेतला होता- अजित पवार**





राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदी सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांचे नाव जाहीर झाले असल्याने आपण त्याबाबत समाधानी आहोत, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधीमंडळाचे विरोधी पक्षनेता अजित पवार यांनी भूमिका मांडत राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला. आम्ही सगळ्यांनी मिळून निवडीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे मला वाईट वाटण्याचा प्रश्नच येत नाही. उलट मीच सुप्रिया सुळे यांचे नाव सुचविले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी खासदार सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड घोषित करीत पक्षांतर्गत भाकरी फिरविली. पवार यांनी भाकरी फिरविल्याबरोबरच अजित पवारांना पक्षांतर्गत शह देण्याचे राजकारण सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. त्या पार्श्वभूमीवर दिल्लाहून विमानाने पुण्यात परतलेल्या अजित पवार यांना विमानतळावर उतरल्यानंतर विचारले असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

### महत्त्वाच्या प्रश्नांना बगल

'सध्या जाती धर्मातील तेढ निर्माण करण्याचे प्रकार सुरू आहेत. अनेक प्रश्न समोर आहेत. ते सोडविण्याऐवजी वाचाळवीर बडबडत असतात. महत्वाच्या लोकांबद्दल बोलले की ते मीडिया चालवते. त्यामुळे महत्वाच्या प्रश्नांना बगल देण्याचे काम केले जात आहे', असे सांगून 'शहरांची नावे बदलली जात आहे. महापुरुषांसह महिलांची नावे शहराला देण्यात आली आहेत. नावे बदलून प्रश्न सुटणार आहेत का', असा सवाल अजित पवार यांनी उपस्थित केला. 'मी नावे बदलण्याच्या विरोधात नाही पण आज जे प्रश्न आहेत त्यात समन्वय साधला पाहिजे', याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### 'मला महाराष्ट्रातच रस'

'प्रफुल्ल भाई आणि मी एकाच वर्षी खासदार झालो होतो. सुप्रिया अनेक वर्षे दिल्लीत आहे. मला महाराष्ट्रातील राजकारणात अधिक रस आहे. हे मी स्टॅम्प पेपरवर लिहून देतो. माझ्यावर राज्याच्या विरोधी पक्षाची जबाबदारी आहे. ती मी पार पाडतो आहे', अशा शब्दांत अजित पवार यांनी आपल्याला राज्याच्या राजकारणातच राहणे पसंत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

### मीच सुप्रिया सुळेंचे नाव सुचविले

**»अजित पवार म्हणाले, 'सुप्रिया सुळे यांना कार्यकारी अध्यक्ष करण्याचा निर्णय आम्ही यापूर्वीच घेतला होता. त्यामुळे मला वाईट वाटण्याचा प्रश्नच नाही. दिल्ली विमानतळावर माझे विमान होते. म्हणून तेथील मिडियाशी मी बोललो नाही. पण सुप्रियाच्या निवडीबाबत आपण समाधानी आहोत. शरद पवार यांनी राजीनामा दिल्यानंतर आमची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यावेळी आम्ही दोन निर्णय घेतले होते. एक तर साहेबांनी राजीनामा मागे घ्यावा आणि कार्यकारी अध्यक्ष म्हणून सुप्रिया सुळेंना घ्या असे मीच सांगितले होते. तेव्हा सगळे म्हणाले, राजीनामा इतकाच मुद्दा मांडा. म्हणून कार्याध्यक्ष निवडीचा विषय मागे राहिला. लोकशाही म्हणून मी गप्प बसलो.'**

### 'हा आमचा पक्षांतर्गत प्रश्न'

**»राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदाची निवड जाहीर करताच त्यावर राजकीय वर्तुळात उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्याबाबत विचारता अजित पवार म्हणाले, 'राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेला आज २४ वर्ष झाली. २४ वर्षांत प्रथमच आपण दिल्लीला गेलो आहोत. कोण कोणाला शह देत नाही. हा आमचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. इतर कोणी नाक खुपसायचे कारण नाही,' असे सांगत पवार यांनी विरोधकांना टोला लगावला. 'पवार साहेब हे एका पक्षाचे राष्ट्रीय नेते आहेत. ते त्यांचं आणि फडणवीस त्यांचे मत व्यक्त करतात. प्रत्येकाला आपापले प्रश्न मांडायचा अधिकार आहे. कोणी काय म्हणाले म्हणून नाराज व्हायचे कारण नाही', याकडेही त्यांनी माध्यमांचे लक्ष वेधले.**

---

# हुकूमशाही प्रवृत्तीच्या केंद्र सरकारचा सांगली 'आप' तर्फे निषेध

## » जिल्हा समन्वयक राम पाटील: मोदी सरकारकडून संविधानाचा अवमान

। सांगली । महाईन्यूज

**दिल्ली सरकारला कायदे बनवण्याचा आणि नोकरीच्या वर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला नकार देणाऱ्या केंद्रातील भाजप सरकारच्या अध्यादेशाविरोधात आम आदमी पार्टीच्या वतीने देशभरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून एक प्रकारे भारतीय संविधानाचा अवमान केला आहे, अशी टीका आम आदमी पार्टीचे सांगली जिल्हा समन्वयक राम पाटील यांनी केली आहे.**



दिल्ली सरकारला कायदे बनवण्याचा आणि नोकरशहांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार ८ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यानंतर मा . सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा दिल्लीवासीयांच्या आणि आम आदमी पार्टीच्या बाजूचा होता दिल्ली सरकारच्या बाजूचा होता जो अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला दिला. तो अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या केंद्रातील भाजप सरकारच्या अध्यादेश विरोधात सांगली येथे निषेध करण्यात आला यावेळी पक्षाचे वसीम मुल्ला, सांगली जिल्हा समन्वयक राम पाटील, सांगली शहर समन्वयक आरिफ मुल्ला, सांगली रिक्षा संघटना अध्यक्ष संभाजी मोरे, निसार मुल्ला, शिवाजी गायकवाड, इमरान सय्यद पठाण, सतीश सौंदडे, रवी कुमार बनसोडे, संदीप कांबळे, संतोष मगदूम, रूबेन काळे, राम कोकरे, श्रीकांत चंदन वाले, युवा नेते विवेक भिंगारदिवे आदी उपस्थित होते. सांगली जिल्ह्यातील आम आदमी पार्टीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निषेध फलक हातात घेऊन केंद्र सरकारचा निषेध व्यक्त केला यावेळी केंद्र सरकार जुलमी केंद्र सरकारच्या विरोधात यावेळी घोषणा दिल्या.

### सत्ताधाऱ्यांचा देशभरात निषेध...

**»राम पाटील म्हणाले की, केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून एक प्रकारे भारतीय संविधानाचा अपमान केला आहे. या अनुषंगाने आम आदमी पार्टीचे संस्थापक व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी विरोधी पक्षातील पदाधिकारी यांची भेट घेऊन त्यांचा पाठिंबा मिळवला आहे. दिल्ली येथे रामलीला मैदानावरती देखील मोठ्या प्रमाणात महा रॅली या केंद्र सरकारच्या विरोधात निघत आहे. त्याच धर्तीवर ती आम आदमी पार्टीच्या वतीने आज भारतभरामध्ये देखील सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे.**

# 'आलिया बेडवर खुपच...', बेडरूमचे सिक्रेट सांगताना काय बोलून गेला रणबीर...

नुकताच रणबीरच्या ॲनिमलचा प्री टिझर रिलिज करण्यात आला आहे. त्याबरोबरच आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी ब्रम्हास्त्र चित्रपटानंतर आता पुन्हा ही जोडी रामायण चित्रपटातील राम आणि सीताची भूमिका साकारताना दिसणार आहे.

आलियाला डेट केल्यानंतर त्याने आलियासोबत लग्न केल. याजोडप्याला राहा ही मुलगी देखील आहे. दरम्यान, आता रणबीर कपूरने आलियाबाबत एक खुलासा केला आहे. त्याने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याचे बेडरूम सिक्रेट शेयर केले आहे. आलियाच्या एका सवयीनं तो खुप त्रस्त झाला आहे.

आलियाला डेट केल्यानंतर त्याने आलियासोबत लग्न केल. याजोडप्याला राहा ही मुलगी देखील आहे. दरम्यान, आता रणबीर कपूरने आलियाबाबत एक खुलासा केला आहे. त्याने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याचे बेडरूम सिक्रेट शेयर केले आहे. आलियाच्या एका सवयीनं तो खुप त्रस्त झाला आहे.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्याने आलियाच्या झोपण्याच्या वाईट सवयीबद्दल सांगितले. इतकच नाही तर आलियाच्या या सवयीमुळे तो किती हैराण झाला आहे हे



सांगितले. आलियाच्या सवयीबद्दल सांगतांना तो म्हणाला की, 'जेव्हा आलिया झोपते तेव्हा बेड आपोआप लहान होऊ लागतो. तिचं डोकं कुठेतरी, हात कुठेतरी आणि पाय कुठेतरी असतो. आणि मी पलंगावर आकसून जातो आणि बेडच्या एका कोपऱ्यात पोहोचतो.


त्यानंतर आलियाने या प्रकरणावर म्हटल्यावर 'तू सहन करतोस?' त्यावर रणबीर म्हणातो की, हो मला त्रास होतो पण मी सहन करतो.जेव्हा आलियाला रणबीरच्या वाईट सवयीबद्दल विचारलं तेव्हा आलिया म्हणाली, 'मला जी वाईट सवय लागली आहे ती म्हणजे साईलेन्स, जेव्हा मी त्याला काही विचारते तेव्हा तो गप्प राहतो. कधीकधी मी त्यांना हलवून विचारते, तरीही ते उत्तर देत नाहीत त्याच्या यासवयीमुळे मी खुप त्रस्त आहे.

# 'मिस्ट्री मॅन'च्या प्रेमात पडली स्वरा भास्कर!



स्वरा भास्कर कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्धीच्या झोतात राहते. कधी ती तिच्या राजकीय विचारांमुळे तर कधी वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असते, मात्र यावेळी ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. स्वराने इंस्टाग्रामवर मिस्ट्री मॅनसोबतचा तिचा एक क्यूट फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये स्वरा आणि मिस्ट्री मॅन एकमेकांचे लाड करताना दिसत आहेत. त्या व्यक्तीचा चेहरा दिसत नाही. स्वराने या फोटोसोबत लिहिलेल्या कॅप्शननंतर चाहते तिला तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सतत प्रश्न विचारत आहेत. अभिनेत्रीने या फोटोला कॅप्शन दिले आहे, 'ये प्यार हो सक्ता है.' आता स्वराच्या या फोटोने लोकांना तिच्या लव्ह लाईफबद्दल विचार करायला लावला आहे. यासोबत स्वराने ब्लॅक हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. मात्र, यामध्ये स्वराचा चेहरा दिसत नाही आणि ती कोणासोबत आहे हेही कळू शकलेले नाही. या पोस्टसोबत स्वरा भास्करने कॅप्शन दिल्यानंतर लोकांनी तिचे अभिनंदन करण्यास सुरुवात केली आहे. मिस्ट्री मॅनसोबतचा स्वराचा हा क्यूट फोटो व्हायरल होत आहे. चाहते आता त्याच गोष्टीची वाट पाहत आहेत, स्वरा लवकरच मिस्ट्री मॅनचे नाव उघड करेल. आम्ही तुम्हाला सांगतो की स्वरा लेखक हिमांशू शर्मासोबत रिलेशनशिपमध्ये होती, 2019 मध्ये त्यांचे ब्रेकअप झाले होते.

# समंथाने लुटली चाहत्यांची मने



यशोदा नंतर, समंथा रुथ प्रभू पुन्हा एकदा पडद्यावर तिच्या नवीन अवतारासह चाहत्यांना भुरळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे. ती बऱ्याच दिवसांपासून तिच्या 'शाकुंतलम' चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी तिच्या 'शाकुंतलम' या पौराणिक चित्रपटाची नवीन रिलीज डेट समोर आली होती. त्यानंतर आता तिच्या मोस्ट अवेटेड चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांसमोर आला आहे.

समंथा रुथ प्रभूचा हा तेलगू चित्रपट संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदीतही प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. हिंदीत नुकताच प्रदर्शित झालेल्या या छोट्या ट्रेलरने चाहत्यांची आणि प्रेक्षकांची उत्सुकता द्विगुणित केली आहे. हा 2 मिनिट 52 सेकंदाचा हिंदी ट्रेलर अगदीच अप्रतिम आहे. ट्रेलरची सुरुवात छोट्या शकुंतलाच्या जन्मापासून होते, जिला तिचा जन्म होताच तिच्या पालकांनी सोडून दिले होते. तिचा जन्म ऋषी विश्वामित्र आणि स्वर्गातील अप्सरा मेनका यांच्या प्रेमसंबंधातून झाला आहे. शकुंतला अनाथ दिसल्यावर ऋषी कण्व तिची काळजी घेतात. एके दिवशी राजा दुष्यंत त्याच्या साथीदारांपासून विभक्त होऊन जंगलात जातो आणि तिथे त्याला शकुंतला दिसते आणि दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू होतात. त्यानंतर दोघेही जंगलातच लग्न करतात. त्यांचे प्रेम वाढत जाते आणि राजा दुष्यंत शकुंतलाला वचन देतो की तो नक्कीच परत येईल. दरम्यान, शकुंतलालाही तिची आई ज्या प्रसंगातून गेली होती अशाच प्रसंगातून तिला जावे लागले हे ट्रेलरमध्ये दाखवण्यात आले आहे.

# इतके दिवसं कुठं होतीस! सलमानच्या चाहत्यांनी सोमी अलीला झाडलं





अभिनेत्री सोमी अली गेल्या अनेक दिवसांपासून तिच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये बॉलिवूड स्टार सलमान खानसोबतच्या तिच्या नात्याबद्दल खुलासा करत आहे. सोमी अलीने पुन्हा एकदा सलमान खानच्या विरोधात अनेक आरोप केले आहेत. या पोस्टच्या माध्यमातून सोमी अलीने सलमान खानवर अनेक गंभीर आरोपपण केले आहेत. सलमान खान विरोधात केलेल्या पोस्टमुळे अभिनेत्रीला खूप ट्रोल केले जात आहे. ती आणि सलमान डेट करत असताना काय घडले या प्रश्नाचे उत्तर देताना तिने लिहिले की ती तिच्या आयुष्यातील सर्वात वाईट वर्षे होती. तो सतत तिला मारहाण करत असे, सलमान ने वर्षानुवर्षे तिला त्याची गर्लफ्रेंड म्हणून सार्वजनिकपणे स्वीकारले नाही आणि शेवटी जेव्हा त्याने असे केले तेव्हा तो त्याच्या मित्रांसमोर तिचा अपमान करेल आणि तिला नॉनस्टॉप मारले असं तिने लिहिले.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीचा अपघात...

मराठी मनोरंजन विश्वातून एक धक्कादायक आणि चिंतेची वार्ता समोर आली आहे. एका प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीचा भीषण अपघात झाला आहे.

अनेक मालिका, रिएलिटी शो, चित्रपट अशा विविध माध्यमातून झळकणाऱ्या अभिनेत्री मीरा जोशी हिचा मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर अपघात झाला आहे. या संदर्भात अभिनेत्रीने स्वतः सोशल मिडियावर पोस्ट सह शेयर करत माहिती दिली आहे.

या अपघातात अभिनेत्रीला फारशी इजा झाली नसली तरी तिच्या गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. तिची गाडी दुभाजकावर धडकल्याने गाडीला जबर फटका बसला आहे. अभिनेत्रीने गाडीचे काही फोटो आणि एक व्हिडिओ शेयर करत या अपघाताची माहिती दिली आहे.



# कोहलीने बाद होऊनही रचला विक्रम!

## सचिन-द्रविड यांच्या दिग्गज क्लबमध्ये केली एंट्री

। लंडन ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**विराट कोहलीने सामन्याच्या चौथ्या दिवशी चौकार मारला आणि एक विक्रम केला आहे. या एका चौकारासह कोहली हा सचिन आणि राहुल द्रविड यांच्या क्लबमध्ये दाखल झाला आहे. विराट कोहली पहिल्या डावात लवकर बाद झाला खरा, पण संघाला गरज असताना दुसऱ्या डावात मात्र आता त्याने दमदार फलंदाजी केली आहे. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना त्याने चौकार लगावला आणि एक मोठा विक्रम आता त्याने आपल्या नावावर केला आहे.**



शुभमन गिल आणि त्यानंतर रोहित शर्मा बाद झाला व कोहलीची मैदानात एंट्री झाली. कोहली मैदानात येताच फक्त सहा चेंडूंमध्येच चेतेश्वर पुजाराही बाद झाला. त्यामुळे भारताची अवस्था बिकट होती. पण कोहलीने यावेळी भारताचा डाव फक्त सावरला नाही तर त्यांना विजयाच्या उंबठ्यावर येऊन उभे केले आहे. पण हे करत असताना कोहलीने आपल्या नावावर एक विक्रमही केला आहे.

भारताचाडाव डगमगायला लागला होता. पण कोहली मात्र आपल्या आक्रमक शैलीत खेळत राहीला. कोहलीने यावेळी चौकाल लगावत संघावरील दडपण दूर केले आणि त्याचबरोबर एका विक्रमाला गवसणी घातली आहे. कोहलीने जेव्हा पहिला चौकार लगावला तेव्हा त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०० धावांचा टप्पा ओलांडत आपल्या नावावर एक अनोखा विक्रम केला. ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०० धावांचचा पल्ला ओलांडणारा कोहली आता पाचवा भारतीय फलंदाज ठरला आहे. कोहलीने नॅथन लायनच्या गोलंदाजीवर चौकार लगावला आणि तो आता सचिन तेंडुलकर, राहुल द्रविडसारख्या दिग्गज फलंदाजांच्या यादीत सामील झाला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा या सचिनच्या नावावर आहे. या क्लबमध्ये सचिन, द्रविड,व्ही.व्ही.एस. लक्ष्मण आणि चेतेश्वर पुजारा यांचा समावेश होता आणि आता यामध्ये कोहली दाखल झाला आहे. पुजाराच्या नावावर २०७४ धावा आहेत. त्यामुळे जर या सामन्यात कोहलीने शतक झळकावले तर तो पुजाराच्या पुढे जाऊ शकतो. त्यामुळे आता कोहली या सामन्याच्या पाचव्या दिवशी शतक झळकावणार की नाही, याची उत्सुकता सर्वांना लागलेली असेल.

### विराट कोहलीचा किस्सा सोशल मीडियावर

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलच्या चौथ्या दिवशी भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने पुन्हा एकदा एक विचित्र इंस्टाग्राम स्टोरी शेअर केली. उजव्या हाताच्या फलंदाजाने चौथ्या दिवशी एकूण सात चौकार मारले आणि 60 चेंडूत 44 धावा केल्या. खडतर मार्गावर, कोहलीने जबरदस्त मानसिक संयम दाखवला आणि तो जबरदस्त लयीत असल्यासारखा दिसत होता. दुसऱ्या डावात 400 पेक्षा जास्त धावांचा पाठलाग करूनही पृष्ठभागाचा वेग आणि उसळी यामुळे फलंदाज निःसंशय दिसला. ओव्हलवर आतापर्यंतचा सर्वाधिक यशस्वी धावांचा पाठलाग 263 आहे, जो इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्ध 1902 मध्ये शतकापूर्वी पूर्ण केला होता आणि त्यामुळे भारताचे ध्येय आणखी कठीण झाले आहे. कोहली क्रीजवर असताना, सर्वांच्या नजरा भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीवर असतील कारण भारताने WTC फायनलच्या 5 व्या दिवशी 280 धावांचे आव्हान ठेवले आहे. पहिल्या डावात अपयशी ठरलेल्या विराटने आपल्या चुकीतून धडा घेत दुसऱ्या डावात चांगली फलंदाजी केली. तो 44 (60)* धावा करून क्रीजवर आहे. WTC फायनलच्या चौथ्या दिवशी भारताचे रन मशीन एलिट यादीत सामील झाले कारण तो ऑस्ट्रेलियाविरुद्ध 2000 पेक्षा जास्त धावा करणारा पाचवा भारतीय फलंदाज ठरला. डब्ल्यूटीसी फायनल्सचा चौथा दिवस विराट कोहली आणि अजिंक्य रहाणे इंडियाने किल्ला राखून संपवला. अजिंक्य रहाणे आणि विराट कोहलीच्या 20 (59)* आणि 44(60)* धावांच्या जोरावर भारताने 40 षटकात 164/3 धावा केल्या. दुसऱ्या डावात शुभमन गिल बाद झाल्यानंतर रोहित शर्मा आणि चेतेश्वर पुजाराने धावफलक हलता ठेवला. पण रोहित शर्मा नॅथन लायनच्या निशाण्यावर आला आणि पुजाराला पॅट कमिन्सने बाद केले. रहाणे आणि कोहलीने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा सामना केला आणि त्यांच्या बचावात्मक कौशल्याने आणि आक्रमक फटक्यांद्वारे भारताला 93/3 अशी स्थिती होती. त्यांनी दिवसअखेर नाबाद 71 धावांची भागीदारी केली.

# मेस्सीला ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी

## सौदीत रोनाल्डो विरुद्ध संघर्ष होण्याची शक्यता

। रियाध ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**स्टार फुटबॉलपटू लियोनेल मेस्सी आता सौदीतील क्लब अल हिलालकडून खेळण्याची चर्चा आहे. यासाठी मेस्सी आणि क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात आली असल्याचे कळते.**

वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा संपल्यावर ख्रिस्तियानो रोनाल्डोने सौदी अरेबियातील अल्-नासेर क्लबकडून खेळण्यास सुरुवात केली. आता लिओनेल मेस्सी सध्याच्या मोसमाची सांगता झाल्यानंतर सौदीतील क्लबकडून खेळण्याची शक्यता आहे. त्याबाबत मेस्सी आणि सौदीतील अल्-हिलाल क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे समजते. त्यांनी मेस्सीला सुमारे ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी दाखवली असल्याचे समजते.

पीएसजीने मेस्सीला दोन आठवड्यांसाठी बडतर्फ केले आहे. त्याचबरोबर त्याच्यासह नव्याने करार करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. ला लीगा अर्थात स्पॅनिश लीगने बार्सिलोनावर घातलेल्या निर्बंधामुळे मेस्सी त्याला घडवलेल्या क्लबकडे परतू शकणार नाही असे समजते. फुटबॉल कारकीर्द अंतिम टप्प्यात असलेला मेस्सी सौदीतील क्लबकडून खेळण्यास तयार असल्याचे समजते.

रोनाल्डोला अल्-नासेर क्लबने डिसेंबरमध्ये करारबद्ध केले. त्या वेळी त्याला प्रतिवर्षी २२ कोटी डॉलर दिल्याचे वृत्त होते. या करारामुळे रोनाल्डो जगातील सर्वाधिक मानधन मिळालेला क्रीडापटू झाला होता. आता अल्-नासेरचे पारंपारीक प्रतिस्पर्धी अल-हिलाल मेस्सीला करारबद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांनी मेस्सीला रोनाल्डोपेक्षा जास्त रक्कम देण्याची तयारी दाखवली आहे. मेस्सीला या करारामुळे ४४ कोटी २०




लाख डॉलर मिळण्याची शक्यता असल्याचा अंदाज ब्रिटनमधील ‘डेली टेलिग्राफ’ने वर्तवला आहे.


गेल्याच आठवड्यात अल्-हिलालने अल्-नासेरचा पराभव केला होता. अल्-नासेरच्या पराभवानंतर अल्-हिलालच्या चाहत्यांनी मेस्सी... मेस्सी असा गजर केला होता. दरम्यान, मेस्सीबरोबरील फेरकराराबाबतच्या प्रश्नावर पीएसजीने मौन बाळगले आहे. दरम्यान, मेस्सी सोमवारी सौदी अरेबियात गेला होता, यास दुजोरा मिळाला आहे. सौदी अरेबियाचे पर्यटन मंत्री अहमद अल खातीब यांनी या संदर्भात ट्वीट केले आहे.

# विक्रमवीर जोकोव्हिचचे २३वे ग्रँडस्लॅम जेतेपद, फ्रेंच खुल्या स्पर्धेत तिसऱ्यांदा विजेता

।पॅरिस।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

टेनिस इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्तम खेळाडू असा लौकिक मिळवण्याच्या दृष्टीने नोव्हाक जोकोव्हिचने रविवारी महत्त्वाचे पाऊल टाकले. जोकोव्हिचने फ्रेंच खुल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नॉर्वेच्या कॅस्पर रुडवर विजय मिळवताना कारकीर्दीतील विक्रमी २३व्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर मोहोर उमटवली. या कामगिरीसह त्याने पुरुषांमध्ये राफेल नदालचा (२२) सर्वाधिक ग्रँडस्लॅम जेतेपदांचा विक्रम मोडीत काढला.



तिसऱ्या मानांकित सर्बियाच्या जोकोव्हिचने अंतिम सामन्यात रुडवर ७-६ (७-१), ६-३, ७-५ अशी मात करताना तिसऱ्यांदा फ्रेंच खुल्या स्पर्धेचे जेतेपद पटकावले. ‘लाल मातीचा बादशाह’ अशी ओळख असणारा १४ वेळचा फ्रेंच स्पर्धेचा विजेता नदाल यंदा दुखापतीमुळे या स्पर्धेत खेळू शकला नाही. त्याच्या अनुपस्थितीत जेतेपदाची सुवर्णसंधी जोकोव्हिचने साधली. त्याने उपांत्य फेरीत अग्रमानांकित कार्लोस अल्कराझला पराभूत केले. मग रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात रुडचा सलग तीन सेटमध्ये पराभव केला.